मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेअंतर्गत झोपडपट्टीधारकांना ६७० सदनिकांचे हस्तांतरण

## मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश गटनेंची माहिती

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी ।**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेअंतर्गत निगडी येथील शरदनगर व आकुर्डी येथील दुर्गानगर येथील ६७० झोपडीधारक सभासदांच्या पुनर्वसन सदनिकांचा लोकापर्ण सोहळा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते सपन्न झाला. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश गटने, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे पदाधिकारी, अधिकारी, मे. रेन्बो डेव्हलपर्सचे रवी जैन, लाभार्थी आदी उपस्थित होते. शरदनगर येथे ३१५ आणि दुर्गानगर येथे ३५५ अशा एकूण ६७० सदनिकांचे बांधकाम पूर्ण झाले असून त्याचा लाभ झोपडीधारकांना होणार आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण दोन मिश्र इमारती (पुनर्वसन घटक + विक्री घटक) बांधण्यात आल्या आहे. दोन्ही इमारतीमध्ये सामाईक क्षेत्राला वीजपुरवठ्यासाठी सौरपॅनेलद्वारे वीजनिर्मिती करण्यात येणार असून प्रत्येक मजल्यावर सुरक्षा जाळी, प्रत्येक सदनिकेच्या खिडक्यांना व स्वच्छता गृहांना डास प्रतिबंधक जाळी बसविण्यात आली आहे. पुनर्वसन प्रकल्पात कनव्हेयंस दुकाने तयार करण्यात आली असून त्यामधून मिळणारे उत्पन्न सोसायटीच्या देखभाल दुरुस्तीसाठी वापरण्यात येणार आहे. पुनर्वसन इमारतीचे वैशिष्ट्य म्हणजे योजनेमध्ये किंडरगार्डन, कम्युनिटीहॉल, प्रति इमारत ४ लिफ्ट, अग्निशमन यंत्रणा, पिण्याच्या आणि वापराच्या पाण्याची सुविधा, ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प, एसटीपी (सीवेज



ट्रीटमेंट प्लांट), जनरेटर बॅकअप, खुलीजागा, बाग, रेनवॉटर हार्वेस्टिंग, २ अंतर्गत रस्ते, ट्यूबलाईट, फॅन, एक्झॉस्ट फॅन आदी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. महानगर पालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या बीएसयुपी व अन्य योजनांतर्गत यापूर्वी लाभ दिलेल्या लाभार्थ्यांव्यतिरिक्त अन्य पात्र लाभार्थ्यांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मार्फत ३०० चौ. फूट (२७.८८चौ.मी.) चटईक्षेत्र असलेली सदनिका विनामूल्य पुरविण्यात येते. १ जानेवारी २००० नंतरच्या मात्र १ जानेवारी २०११ पूर्वीच्या पात्र झोपडीधारकाना सशुल्क २ लाख ५० हजार रुपये प्रती सदनिकाप्रमाणे पुनर्वसन सदनिका देय आहे. झोपडीधारकांची सहकारी संस्था नोंदणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील सहकार विभागामार्फत करण्यात येते. झोपडीधारक व विकसकांनी नवीन प्रकल्प पाहून त्यासारखाच झोपडपट्टीच्या ठिकाणी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यासाठी नियोजन करावे. त्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे पूर्ण सहकार्य राहील. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रातील झोपडीधारकांनी पुनर्वसन प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे. त्यासाठी तातडीने पात्रता याद्या तयार करण्यासाठी व पात्र धोपडीधारकांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासाठी प्राधिकरणाकडे संपर्क साधावा, असे आवाहन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश गटने यांनी केले.

### ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प

**» पुनर्वसन प्रकल्पात कनव्हेयंस दुकाने तयार करण्यात आली असून त्यामधून मिळणारे उत्पन्न सोसायटीच्या देखभाल दुरुस्तीसाठी वापरण्यात येणार आहे. पुनर्वसन इमारतीचे वैशिष्ट्य म्हणजे योजनेमध्ये किंडरगार्डन, कम्युनिटीहॉल, प्रति इमारत ४ लिफ्ट, अग्निशमन यंत्रणा, पिण्याच्या आणि वापराच्या पाण्याची सुविधा, ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प, एसटीपी (सीवेज ट्रीटमेंट प्लांट), जनरेटर बॅकअप, खुलीजागा, बाग, रेनवॉटर हार्वेस्टिंग, २ अंतर्गत रस्ते, ट्यूबलाईट, फॅन, एक्झॉस्ट फॅन आदी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.**

---

# महापालिकेच्या वतीने आदर्श शिक्षकांचा सन्मान!

## विद्यार्थ्यांचे यश हे शिक्षकांच्या शिकविण्यावर अवलंबून

**पिंपरी।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**


पिंपरी चिंचवड महानगरपालिका आज शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देत आहे. महापालिका स्थापन झाल्यापासून अशा प्रकारचा पुरस्कार देण्याची देण्याची या महापालिकेची परंपरा आहे. विद्यार्थ्यांचे यश हे शिक्षकांच्या शिकविण्यावर अवलंबून असते, शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाचा, अनुभवाचा, संस्काराचा परिणाम विद्यार्थ्यांवर होत असतो, असे सांगून पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांचे अभिनंदन करून शिक्षक दिनानिमित्त सर्व शिक्षकांना दूरध्वनी संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या. महानगरपालिकेच्या वतीने आज शिक्षक दिनानिमित्त चिंचवड येथील प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याचे तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



या पुरस्कार वितरण कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संजय नाईकडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी तसेच महापालिका शाळांतील शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे पाठविलेल्या संदेशात सांगितले, शिक्षकांसाठी विद्यार्थी हा केंद्रबिंदू असतो. विद्यार्थ्याला बदलत्या जगाची ओळख करून देऊन त्यांच्या स्वप्नांना पंख देण्याचे काम शिक्षक करत असतात. शाळेतील गुणवत्ता वाढीसाठी महापालिका यशस्वी प्रयत्न करित असून महापालिकेच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची भविष्यात संख्या वाढेल असा विश्वास व्यक्त केला तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आणि शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी महापालिका शाळांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी अधिकतम प्रयत्न करित असून विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येच्या प्रमाणात वर्गांची संख्येत वाढ करणेकामी आढावा घेत असून शिक्षकांचे प्रमाण देखील वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच जांभळे पाटील यांनी मी स्वत: शिक्षक होतो त्यामुळे शिक्षकांचे कर्तव्य आणि जबाबदाऱ्या याची मला जाणीव असल्याचे सांगितले.

# १ हजार २३५ शिक्षकांना 'धन्वंतरी'चा लाभ!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची भीमगर्जना



**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महापालिकेच्या प्राथमिक शाळेतील एक हजार २३५ शिक्षकांना शिक्षक दिनाची भेट मिळाली आहे. या शिक्षकांना धन्वंतरी स्वास्थ योजना लागू करण्याचा निर्णय आयुक्त शेखर सिंह यांनी घेतला. यामुळे शिक्षक संघटनांसह शिक्षकांनी आनंद व्यक्त केला आहे. शिक्षक संघटना कृती समितीच्या वतीने शिक्षण दिनाच्या दिवशी आंदोलनाचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर प्राथमिक शाळेतील शिक्षकांना धन्वंतरी योजना लागू करण्याचा निर्णय आयुक्त सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी घेतला. महापालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी, त्यांच्यावर अवलंबून असणारे कुटुंबीय आणि सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी धन्वंतरी स्वास्थ योजना १ सप्टेंबर २०१५ पासून सुरू करण्यात आली. योजना सुरू झाल्यानंतर कर्मचारी आणि त्यांचे नातेवाईक धन्वंतरी योजनेच्या रचने (पॅनल) वरील रूग्णालयांमध्ये उपचार घेतात. या योजनेमध्ये महापालिकेच्या माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा समावेश होता; परंतु १०५ प्राथमिक शाळेतील शिक्षकांचा समावेश नव्हता. या शिक्षकांचा समावेश करण्याची शिक्षकांसह शिक्षक संघटनांची मागणी होती. त्यासाठी निवेदने, आंदोलनही करण्यात आली. अखेर त्यांच्या मागणीला यश आले असून एक हजार २३५ शिक्षकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

### दरमहा ३०० रूपये स्वहिस्सा भरावा लागणार

» शिक्षकांना धन्वंतरी योजनेसाठी दरमहा ३०० रूपये स्वहिस्सा आणि सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना दरमहा १५० रूपये स्वहिस्सा जमा करावा लागणार आहे. हे पैसे त्यांच्या वेतनातून अथवा पेन्शनमधून कपात केले जाणार आहेत. जमा होणाऱ्या हिश्श्याच्या दुप्पट रक्कम महापालिका धन्वंतरी निधीत जमा करते.

# 'त्या' बांधकाम व्यावसायिकांवर फौजदारी गुन्हा दाखल करा!

## पाणी न पुरवता लिहून दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड शहरातील बांधकाम व्यावसायिकांनी महापालिकेला त्यांच्या गृहप्रकल्पास बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेताना सोसायटीधारकांना ते ''स्वखर्चाने पाणीपुरवठा करतील'' असे शपथेवर लिहून दिले आहे. मात्र, सोसायटीधारकांना स्वखर्चाने पाणी न पुरवता लिहून दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन केले जात आहे. अशा बांधकाम व्यावसायिकांवर भारतीय दंड संहिता कलम २०० नुसार फौजदारी गुन्हे दाखल करावे, अशी मागणी चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये आयुक्त दालनात फेडरेशनचे पदाधिकारी आणि




आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत ३० ऑगस्ट २०२३ रोजी झालेल्या बैठकीचा संदर्भ देण्यात आला आहे. निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरातील बांधकाम व्यावसायिक हे त्यांच्या गृहनिर्माण प्रकल्पांना भाग पूर्णत्वाचा दाखला घेताना तसेच पूर्णत्वाचा दाखला घेताना हे विकसक सोसायटी धारकांना स्वखर्चाने पाणीपुरवठा करतील असे शपथेवर हमीपत्र लिहून देऊन बांधकाम पूर्णत्वाचे दाखले घेतात. परंतु, त्यानंतर एकही बांधकाम व्यावसायिक सदनिकाधारकांना त्यांच्या स्वखर्चाने पाणी पुरवत नाहीत. उलट सदनिकाधारकांच्या कडून घेतलेल्या आगाऊ देखभाल खर्चातूनच हा खर्च करतात. भारतीय दंड संहिता कलम २०० नुसार जर एखाद्या नागरिकाने किंवा एखाद्या कंपनीच्या समूहाने किंवा एखाद्या व्यावसायिकाने शपथेवर लिहून दिलेल्या हमीपत्राचे उलंघन केले तर हा भारतीय दंड संहिता कलम २०० नुसार गुन्हा आहे. तसेच, हमीपत्रा व्यतिरिक्त सदनिका धारकाची फसवणूक करण्यासाठी हे बांधकाम व्यावसायिक ग्राहकांकडून त्यांच्या करारनाम्यामध्ये सदनिकाधारक विकत घेतल्या जाणाऱ्या पाण्याचा खर्च स्वतः करतील असा कुठलाही उल्लेख करणार नाहीत असे देखील या लिहून घेणाऱ्या हमीपत्र मध्ये स्पष्टपणे उल्लेख करावा आणि नागरिकांची आणि पिंपरी चिंचवड मनपाची होणारी फसवणुकीला आळा घातला पाहिजे. ज्या बांधकाम व्यावसायिक यांनी बांधकाम पूर्णत्वाचे दाखले घेताना स्वतः स्वखर्चाने आम्ही सदनिकाधारकांना पाणीपुरवठा करतील असे हमीपत्र लिहून दिलेले आहे त्यांना हमीपत्रानुसार सोसायटी धारकांना पाणी पुरवण्याचे आदेश दिले पाहिजेत, असेही सांगळे यांनी म्हटले आहे. शहरातील बहुतेक बांधकाम व्यवसायिकांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये स्वखर्चाने पाणीपुरवठा करेल अशा लिहून दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन केलेले आहे. याबाबत आम्ही वारंवार आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना अवगत केलेले आहे. तरीदेखील प्रशासनाकडून अशा सर्व बांधकाम व्यावसायिकांना पाठीशी घातले जात आहे. प्रशासन आणि बांधकाम व्यावसायिक यांच्याकडून संगणमताने आमची पिळवणूक चालू असल्याचे सांगळे यांनी म्हटले आहे.

# वाहतुकीचे उल्लंघन चिंचवडकर आघाडीवर


**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शहरातील महत्वाच्या चौकांमध्ये गेल्या काही वर्षांत वाहतूक नियंत्रक दिवे लावण्यात आले असून, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाईचे प्रमाण वाढले आहे. गेल्या पाच वर्षांत १ लाख ७८ हजार ५६२ वाहन चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केले आहे. त्यांच्याकडून वाहतूक विभागाने तब्बल ६ कोटी ७ लाख ७७ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. पिंपरी – चिंचवड पोलीस आयुक्तालयाची स्थापना १५ ऑगस्ट २०१८ रोजी झाली. आयुक्तालय स्थापन होऊन पाच वर्षांचा कालावधी उलटला आहे. आयुक्तालयाच्या हद्दीत वाहतूक विभागाच्या चौक्या आणि मनुष्यबळ वाढविण्यात आले आहे. याशिवाय शहरातील महत्वाच्या चौकांमध्ये वाहतूक नियंत्रक दिवे लावण्यात आले आहेत. त्यामुळे कारवाईचा वेग वाढल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. शहरातील विविध मार्गांवर बीआरटी थांबे रस्त्याच्या उजव्या बाजूला उभारले आहेत. थांब्यावर उतरलेल्या प्रवाशांना बीआरटी मार्ग ओलांडता यावा, यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, या यंत्रणेचा वापर होत नसल्याचे दिसून येते. शहरातील विविध चौकांमध्ये वाहतूक पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, पोलीस हे वाहतुकीचे नियमन करण्याऐवजी कारवाईकडे लक्ष असल्याचेही चित्र आहे.

> वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर वेळोवेळी दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. यापुढेही कडक कारवाई केली जाणार आहे. नियमांचे पालन न केल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे चालकांनी नियमांचे पालन करावे.
>
> – विठ्ठल कुबडे, सहाय्यक पोलीस आयुक्त

# डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरण!

## ‘सीबीआय’ तपासाचा अहवाल १३ सप्टेंबरला न्यायालयात




### २० साक्षीदारांची साक्ष नोंदविली

» डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणात डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, सचिन अंदुरे, शरद कळसकर, विक्रम भावे, ॲड. संजीव पुनाळेकर यांच्याविरुद्ध आरोप निश्चित करण्यात आले आहेत. डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणात सीबीआयचे तत्कालीन तपास अधिकारी एस. आर. सिंग यांची बचाव पक्षाकडून उलटतपासणी घेण्यात आली. मंगळवारी (५ सप्टेंबर) उलटतपासणी पूर्ण झाली. ॲड. सुवर्णा वस्त यांनी सिंग यांची उलट तपासणी घेतली. आतापर्यंत सीबीआयकडून याप्रकरणात २० साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यांची उलटतपासणी घेण्यात आली. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांसह ससून रुग्णालयाच्या शवविच्छेदन विभागातील डॉ. अजय तावरे, पोलीस उपनिरीक्षक नवनाथ रानगट, तपास अधिकारी एस. आर. सिंग यांची उलटतपासणी घेण्यात आली.

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाचे (सीबीआय) तपास अधिकारी एस. आर. सिंग यांची उलटतपासणी मंगळवारी पूर्ण झाली. सीबीआयने आतापर्यंत केलेल्या तपासाबाबतचा अंतिम अहवाल १३ सप्टेंबर रोजी न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणात डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, सचिन अंदुरे, शरद कळसकर, विक्रम भावे, ॲड. संजीव पुनाळेकर यांच्याविरुद्ध आरोप निश्चित करण्यात आले आहेत. डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणात सीबीआयचे तत्कालीन तपास अधिकारी एस. आर. सिंग यांची बचाव पक्षाकडून उलटतपासणी घेण्यात आली. मंगळवारी (५ सप्टेंबर) उलटतपासणी पूर्ण झाली. ॲड. सुवर्णा वस्त यांनी सिंग यांची उलट तपासणी घेतली. आतापर्यंत सीबीआयकडून याप्रकरणात २० साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यांची उलटतपासणी घेण्यात आली. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांसह ससून रुग्णालयाच्या शवविच्छेदन विभागातील डॉ. अजय तावरे, पोलीस उपनिरीक्षक नवनाथ रानगट, तपास अधिकारी एस. आर. सिंग यांची उलटतपासणी घेण्यात आली. सीबीआयने निश्चित केलेल्या सर्व साक्षीदारांची साक्ष, तसेच उलटतपासणी पूर्ण झाली आहे. याप्रकरणात आणखी काही साक्षीदार न्यायालयात सादर करायचे असल्यास याबाबतची यादी सीबीआयला न्यायालयात सादर करावी लागणार आहे. तपासाबाबतचा अंतिम अहवाल, तसेच नव्याने काही साक्षीदार निश्चित केल्यास त्यांची नावे १३ सप्टेंबर रोजी न्यायालयात सादर केली जाणार आहे, अशी माहिती सीबीआयचे विशेष सरकारी वकील ॲड. प्रकाश सूर्यवंशी यांनी न्यायालयात दिली.

# प्रशिक्षणाने नव्या पिढीतील संशोधक होतील तयार!

## ‘नासा ट्रेनिंग प्रोग्राम’साठी निवडलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार




### १२ विद्यार्थी सिंगापूरला जाणार

» अमेरिकेतील नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन (नासा), तसेच सिंगापूर सायन्स सेंटर येथील प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निवडण्यात आलेल्या २३ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी डॉ. खंदारे बोलत होते. स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशन आणि सेडॉर इंटरनॅशनलच्या वतीने इयत्ता ६ वी ते १० वीच्या मुलांसाठी नुकतीच ही परीक्षा घेण्यात आली होती. यातील ११ विद्यार्थी 'नासा', तर १२ विद्यार्थी सिंगापूरला जाणार आहेत.

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) चांद्रयान-३ मोहीम यशस्वी करत सर्व भारतीयांची शान वाढवली आहे. अशा संशोधन मोहीमा भविष्यात यशस्वी होण्यासाठी शालेय वयातच विद्यार्थ्यांना संशोधनाची गोडी लागावी. 'नासा' प्रशिक्षण कार्यक्रमातून नव्या पिढीतील अनेक संशोधक तयार होतील, असे मत प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. जयंत खंदारे यांनी व्यक्त केले.

अमेरिकेतील नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन (नासा), तसेच सिंगापूर सायन्स सेंटर येथील प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निवडण्यात आलेल्या २३ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी डॉ. खंदारे बोलत होते. स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशन आणि सेडॉर इंटरनॅशनलच्या वतीने इयत्ता ६ वी ते १० वीच्या मुलांसाठी नुकतीच ही परीक्षा घेण्यात आली होती. यातील ११ विद्यार्थी 'नासा', तर १२ विद्यार्थी सिंगापूरला जाणार आहेत. कोथरूड येथील भारती विद्यापीठाच्या विधी महाविद्यालय सभागृहात झालेल्या कार्यक्रमावेळी लेफ्टनंट जनरल (नि.) राजेंद्र निंभोरकर, महिला व बालकल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, कस्टमचे आयुक्त राजेश डाबरे, आयएएस प्रेरणा देशभ्रतार, डॉ. पल्लवी दराडे, युएस स्पेस अँड रॉकेट सेंटरच्या अँबेसेडर व स्वान फाऊंडेशनच्या संचालक सुदेष्णा परमार, स्वान फाऊंडेशन आणि सेडॉर इंटरनॅशनलचे संचालक एम. तिरुमल, आयेशा सय्यद, स्वान फाऊंडेशनचे संस्थापक संचालक शशिकांत कांबळे, संचालक अश्विनी सांळुके आदी उपस्थित होते.


'नासा'साठी अथर्व हेमंत राणे (सिंधुदुर्ग), आयुष गोविंद चव्हाण (नांदेड), वैष्णवी बापूराव खोमणे (बारामती), तेजश्री चौधरी (परभणी), तन्मय संतोष कोरडे (सातारा), सुमेध सागर देशपांडे (रायगड), शौर्य वैभव गडकरी व अनुज सचिनकुमार तांबे (पुणे), अनुज संदेश साळवी (रत्नागिरी), पार्थ नागनाथ थिटे (मुंबई) आणि रीतिशा सुशीलकुमार सावळे (हिंगोली) यांची, तर सिंगापूरसाठी सुयोग सुधीर अमृतकर (जळगाव), शुभम सचिन उबाळे (पैठण), समीक्षा प्रवीण अंगबारे (लातूर), अथर्व सुनील गिरी (अमरावती), संस्कृती सोमनाथ अंबाले (चाकण), मरियम ओमर मोमीन (पुणे), आर्या मुगुटराव ढाणे (रत्नागिरी), अनुष्का उमेश बारकूल (उस्मानाबाद), अनुष्का अशोक अकोलकर (अहमदनगर), आकांक्षा योगेश निकोडे (गडचिरोली), अजिंक्य केरसिंग विक्रम (बीड), अदिती विकास डांगे (सोलापूर) यांची निवड झाली आहे.

# रेल्वेसाठी साखरेवरील निर्यात निर्बंध 'कडू'

## जालना लाठीमार प्रकरण; सरकारचा निषेध

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

केंद्र सरकारने साखरेच्या निर्यातीवर या हंगामात निर्बंध घातले आहेत. या हंगामातील निर्यातीचा कोटा पूर्ण झाल्याने सध्या साखरेची निर्यात बंद आहे. हे साखरेवरील निर्यात निर्बंध रेल्वेसाठी कडू ठरले आहेत. कारण चालू आर्थिक वर्षात मध्ये रेल्वेच्या पुणे विभागाला यामुळे सुमारे २० कोटी रुपयांचा फटका बसला आहे. मध्य रेल्वेच्या पुणे विभागाला आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी मालवाहतुकीतून ४८५ कोटी रुपयांचे उत्पन्नाचे उद्दिष्ट आहे. पुणे विभागाने एप्रिल ते ऑगस्ट या पाच महिन्यांच्या कालावधीत १७३.९१ कोटी रुपयांचे उद्दिष्ट गाठले आहे. रेल्वेने ऑगस्टपर्यंत निश्चित केलेले उद्दिष्ट १९८.२७ कोटी रुपये होते. रेल्वेने आता गाठलेले उद्दिष्ट हे १२.३ टक्क्याने कमी आहे. रेल्वेला प्रामुख्याने साखरेवरील निर्यात निर्बंधांचा फटका बसला आहे. साखरेची वाहतूक कमी झाल्याने रेल्वेच्या उत्पन्नात घट



झाली आहे. पुणे विभागाला मालवाहतुकीतून मिळणाऱ्या उत्पन्नात साखरेचा वाटा ४० टक्के असतो. रेल्वेने मागील आर्थिक वर्षात ऑगस्टपर्यंत ५ लाख २३ हजार ९८४ टन साखरेची वाहतूक केली होती. चालू आर्थिक वर्षात ऑगस्टपर्यंत ही वाहतूक २ लाख ५३ हजार ७०१ टन आहे. मागील आर्थिक वर्षात रेल्वेला ऑगस्टपर्यंत साखर वाहतुकीतून ८९.७८ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. चालू आर्थिक वर्षात ऑगस्टपर्यंत हे उत्पन्न ७०.५५ कोटी रुपये आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यात सुमारे २० कोटी रुपयांची घट झाली आहे.

> **"निर्यात निर्बंधामुळे रेल्वेने होणारी साखरेची वाहतूक कमी झाली आहे. त्याचा फटका उत्पन्नाला बसला आहे. याचबरोबर ईशान्य भारतात आता महाराष्ट्राऐवजी उत्तर प्रदेशातून साखर पाठविली जात असल्याने त्याचाही परिणाम होऊन मालवाहतुकीचे उत्पन्न कमी झाले आहे.**
>
> **– डॉ. रामदास भिसे,**
> **जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे**

# तंत्रज्ञान, विश्वास, प्रतिभा याचा वापर करून व्यावसायिक कुशलता वृद्धिगत करा

## डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे प्रतिपादन


**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

तंत्रज्ञान, विश्वास, प्रतिभा या त्रिसूत्रीचा वापर करून आपल्या अंगी व्यावसायिक कुशलता वृद्धिगत होण्यासाठी उपयोग करण्याचे आवाहन पदमविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले. १८ वा महाराष्ट्र राज्य पोलिस कर्तव्य मेळाव्याचे उद्घाटन मंगळवारी राज्य राखीव पोलिस दल गट क्र. २ पुणे येथील परेड मैदानावर डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. स्पर्धेत सहभागी २४ संघांनी शिस्तबद्ध संचलन करुन प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली.



गतवर्षीच्या ६६ वा अखिल भारतीय पोलिस कर्तव्य मेळाव्यामध्ये पदक विजेत्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचा डॉ. माशेलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रशांत बुरडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचे हस्ते गतवर्षीच्या ६६ वा अखिल भारतीय पोलिस कर्तव्य मेळाव्यामध्ये पदक विजेत्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी स्पर्धकांना व उपस्थितांना टेक्नॉलॉजी, ट्रस्ट, टॅलेंट या त्रिसुत्रींचा आपल्या अंगी व्यावसायिक कुशलता, वृद्धींगत होण्यासाठी उपयोग करण्याचे आवाहन केले. तसेच स्पर्धकांना निकोप व खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा पार पाडण्याविषयी मार्गदर्शन करून आगामी अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याकरिता शुभेच्छा दिल्या. ६६ व्या अखिल भारतीय कर्तव्य मेळाव्यामध्ये सुवर्ण पदक प्राप्त करणाऱ्या श्रीकृष्ण गोविंद गवस, पोलिस उप निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल यांना उद्घाटन ज्योत आणण्याचा मान देण्यात आला व त्यांनी स्पर्धकांना शपथ दिली. सदर कार्यक्रमास प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक सीआयडी, सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, डॉ. दिलीप पाटील-भुजबळ, विशेष पोलीस महानिरीक्षक, सीआयडी, संजय येनपुरे, विशेष पोलीस महानिरीक्षक, सीआयडी, अशोक मोराळे, विशेष पोलीस महानिरीक्षक, एस. आर.पी.एफ. पुणे, रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त, पूर्व विभाग, पुणे शहर, नामदेव चव्हाण, पोलीस उप महानिरीक्षक, सारंग आवाड, पोलीस उपमहानिरीक्षक, प्रशासन, पंकज देशमुख, पोलीस अधिक्षक, , नम्रता पाटील, समादेशक, एस. आर.पी.एफ., गट क्र.२, दिनेश बारी, पोलीस अधिक्षक, मनिषा दुबुले, पोलीस अधिक्षक, पल्लवी बर्गे, पौर्णिमा तावरे, अपर पोलीस अधिक्षक, एम. आय. ए., पुणे तसेच गुन्हे अन्वेषण विभाग, राज्य राखीव पोलीस दल व एम.आय.ओ. येथील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# देशात पुण्याची आघाडी!



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पुण्यात पहिल्या सहामाहीत पुनर्विक्री वगळून ४५ हजार घरांची विक्री झाली आहे. त्यांची किंमत २८ हजार कोटी रुपये आहे. एकूण व्यवहारात २०१९ च्या तुलनेत ९० टक्के वाढ झाली आहे. देशातील इतर महानगरांच्या तुलनेत पुण्यातील गृहनिर्माण बाजारपेठ ही परवडणारी आणि प्राधान्याने वाढणारी असल्याचे क्रेडाई सीआरईच्या अहवालातून समोर आले आहे. सीआरई मॅट्रिक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक गुप्ता आणि डेटा ॲनालिस्ट राहुल अजमेरा यांनी हा अहवाल जाहीर केला. क्रेडाई पुणे मेट्रोचे अध्यक्ष रणजित नाईकनवरे, जनसंपर्क विभागाचे समन्वयक कपिल गांधी, व्यवस्थापकीय समिती सदस्य अभिषेक भटेवरा आणि महासंचालक डॉ. डी के अभ्यंकर आदी या वेळी उपस्थित होते. याबाबत अभिषेक गुप्ता म्हणाले की, पुण्यात २०२३ मध्ये पहिल्या सहामाहीत ४५ हजार १६२ घरांची विक्री झाली. पुण्यात २०१९ च्या पहिल्या सहामाहीत ३२ हजार २५० घरांची विक्री झाली होती. याचाच अर्थ करोनापूर्व काळाच्या तुलनेत २०२३ च्या पहिल्या सहामाहीत घरांची विक्री ४० टक्क्यांनी वाढली आहे. पुण्यात यंदा पहिल्या सहामाहीत विक्री झालेल्या घरांची सरासरी किंमत ही ६३ लाख रुपये आहे. ही किंमत २०१९ च्या पहिल्या सहामाहीच्या तुलनेत ३७ टक्क्यांनी जास्त असल्याचे समोर आले आहे. घरांचा सरासरी आकार आणि किंमत या दोन्ही गोष्टी वाढत आहेत. तसेच, २०१९ च्या तुलनेत २०२३ च्या पहिल्या सहामाहीत १ कोटी किंमत असलेल्या घरांच्या विक्रीत तबल २५० टक्के वाढ झाली आहे.